अहवाल दिनांक : 21/11/2022

# महाराष्ट्र शासन

## गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ]

19253617372

गाव :- हिंगणा म्हैसपुर ( 530140 )　तालुका :- अकोला　जिल्हा :- अकोला

ULPIN : 19253617372　गट क्रमांक व उपविभाग : 62/3/41

भू-धारणा पध्दती : भोगवटादार वर्ग -I　शेताचे स्थानिक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शेताचे एकक: आर.चौ.मी<br>अकृषिक क्षेत्र<br>एकूण क्षेत्र 20.12.00<br>आकारणी 0.00 | 556 | महाराष्ट्र शासन ओपन स्पेस | 20.12.00 | | | ( 2208 ) | कुळाचे नाव व खंड<br>इतर अधिकार<br>अकृषिक वापर - रहिवास (गावठाणव्यतिरिक्त)<br>रमाक्र.एनएपी 34/हिंगणा-म्हैसपुर/41/2004-2005 दि.14/02/2008 ( 2208 )<br>प्रलंबित फेरफार : नाही.<br>शेवटचा फेरफार क्रमांक : 2870 व दिनांक : 03/11/2022 |
| जुने फेरफार क्र. ( 2208 )( 2660 )( 2870 ) | | | | | | | सीमा आणि भुमापन चिन्हे : |

## गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ]

गाव :- हिंगणा म्हैसपुर ( 530140 )　तालुका :- अकोला　जिल्हा :- अकोला

: 62/3/41

| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | आर.<br>चौ.मी | आर.<br>चौ.मी | | | आर.<br>चौ.मी | |

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."
दिनांक :- 21/11/2022
सांकेतिक क्रमांक :- 270500040051240000112022151

आर.व्ही.देवीकर
( नाव :- आर व्ही देवीकर )
तलाठी साझा :- सोमठाणा ता :- अकोला जि :-अकोला
साझा क्र. २९
दि. २१/११/२२

292 13

**श्री.तेजूसिंग पवार, उपविभागीय अधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला.**

रामाक्र- एनओपी-३४/हिंगणा-म्हैसपूर/४१/२००४-२००५

अर्जदार :- १. वासुदेव जमनादास आनंदाणी
२. प्रकाश जमनादास आनंदाणी
३. जमनादास दुर्गादास आनंदाणी (मयत) तर्फे अर्जदार क्र.१ व २
रा.हिमालय आईस फॅक्टरी,गुरुद्धाराजवळ, अकोला.

आदेश

(पारित दिनांक १५ माहे फेब्रुवारी २००८)

आवेदक १. वासुदेव जमनादास आनंदाणी २. प्रकाश जमनादास आनंदाणी, ३. जमनादास दुर्गादास आनंदाणी (मयत) तर्फे अर्जदार क्र.१ व २सर्व रा.हिमालय आईस फॅक्टरी, गुरुद्धाराजवळ, अकोला. यांनी त्यांचे मालकीच्या मौजे हिंगणा-म्हैसपूर, ता.जि. अकोला येथील शेत सर्व्हे नं. ६२/३ यातील क्षेत्र ३.१५ हे.आर. या शेजमिनीचे निवासी प्रयोजनाकरीता अकृषक वापराची परवानगी मिळणेसाठी विहीत नमुण्यात अर्ज सादर केला आहे, अर्जासोबत अर्जदाराने मालकीहक्काबाबत ७/१२ उतारा, २. टिपण उतारा, ३. मोजणी शिट (ब) प्रत, ४. प्रस्तावित भुखंडक अभिन्यासाचे प्रती संलग्न केलेल्या आहेत. प्राप्त अर्जाचे अनुषंगाने प्रकरण पंजीबध्द करुन घेण्यात येऊन प्रकरणात पुढील चौकशी/कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(१) प्रकरण तपासणी करुन अकृषक निवासी परवानगीबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात येऊन, मामल्यात सदरच्या प्रस्तावित जमिनीचे बाबतीत दिनांक ९.३.०५ रोजी जाहीरनामा काढुन तहसिलदार अकोला, सचिव ग्राम पंचायत हिंगणा-म्हैसपूर, संबंधित गाव तलाठी हिंगणा-म्हैसपूर यांचेकडे प्रसिध्दीस पाठविण्यात आला. तसेच कार्यालयाच्या सूचना फलकावर लावुन प्रसिध्द करण्यात आला.

(२) आवेदकाने सादर केलेल्या भुखंडक अभिन्यासांबाबत संबंधित विभाग/कार्यालये यांचेकडुन अभिप्राय मागविण्यात आले आहेत व मामल्यासह ठेवले आहेत. संबंधित विभाग/कार्यालय यांचेकडुन प्राप्त अभिप्राय-अहवाल बाबत खालील प्रमाणे माहिती विवेचन देण्यात येत आहे.

अ) सहाय्यक संचालक, नगर रचना अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अकृषीक/मौजे हिंगणा-म्हैसपूर/स.क्र.६२/३ /ससंअ/७९२ दिनांक १५.४.२००५ नुसार प्रकरणात प्रस्तावित भुखंडक अभिन्यासास तांत्रिक मंजुरी प्रदान करुन तात्पुरत्या मंजुर अभिन्यासाप्रमाणे तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख अकोला यांचेकडुन भुखंडक निहाय मोजणी करुन घेण्याकरीता कळविले. अर्जदाराने तात्पुरत्या मंजुर अभिन्यासाप्रमाणे एकुण ५१ भुखंडकाची मोजणी फी रुपये १३,०००/- चालानद्वारे भरणा केला आहे. त्यानुसार प्रकरणात तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख अकोला यांनी मो.र.क्र.४२१/०४-०५ नुसार प्रत्यक्ष मोक्यावर जाऊन भुखंडकनिहाय मोजणी करुन पत्र दिनांक ५.९.२००५ नुसार मुळ क प्रत या कार्यालयास सादर केली आहे. तथापी सदर प्रकरणातील प्रस्तावित जमिन ही राष्ट्रीय महामार्गाचे लगत असल्याने, महामार्गाचे मध्यरेषेपासुन ७५ मिटर अंतरापर्यन्त हरीतपट्टा सोडून त्यानंतर १२.०० मि. चा सेवा रस्ता रस्ता अभिन्यासात प्रस्तावित करणेबाबत प्रमुख मुद्या कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग क्र.१३ अमरावती यांचे पत्र क्र. क्र.४५४/तां.अनु.२ दिनांक ७.२.२००६ अन्वये कळविल्यानुसार विचाराधीन होता, सदरहू मुद्यांचे अनुषंगाने अटीप्रमाणे पुर्तता होत आहे किंवा कसे ? याबाबत सहायक संचालक नगर रचना अकोला यांचेकडे पुनश्च विचारणा केली असता, त्यांनी पत्र क्र.अकृषीक/हिंगणा-म्हैसपुर/६२/३ ससंअ/१२८६ दि.१४.७.०६ नुसार वरील मुद्यांचे अनुषंगाने कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग क्र १३, अमरावती यांचेशी संपर्क साधुन त्याचे अभिप्रायनुसार सुधारित अभिन्यास सादर करावेत, तदनंतरच

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER AKOLA

हिंगणा म्हैसपूर ६२/३

अभिप्राय कळविण्यात येईल. असे कळविले. अंतीमत: अर्जदार यांनी दिनांक १०.९.२००७ रोजी या कार्यालयास सुधारित अभिन्यास सादर केलेत. सबब अर्जदाराने सादर केलेल्या सुधारित अभिन्यासाचे अनुषंगाने, सहायक संचालक नगर रचना अकोला यांचे, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग क्र.१३ अमरावती यांचे वरील नाहरकत प्रमाणपत्र संलग्न करुन फेर अभिप्राय मागविण्यात आले असता त्यांनी पत्र क्र. अकृषीक मौजे हिंगणा-म्हैसपुर/स.क्र.६२/२ जा.क्र.१५३९ दिनांक ३०.१०.२००७ अन्वये पुनश्च सुधारित अभिन्यासास तात्पुरती मंजुरी करुन, सुधारीत तात्पुरत्या मंजुर अभिन्यासाप्रमाणे प्रत्यक्ष भुखंडनिहाय मोजणी करुन घेण्यास कळविले.

अ-१) प्रकरणात अर्जदार यांनी सादर केलेल्या सुधारित अभिन्यासास सहायक संचालक नगर रचना अकोला यांचेकडुन मंजुरी प्राप्त झालेनंतर तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख अकोला यांना पुर्वीची मो.र.क्र.८२१/०४-०५ नुसार झालेली मोजणी रद्द ठरवुन सुधारित अभिन्यासाप्रमाणे फेरमोजणी करण्याबाबत सुचित करण्यात येऊन या कामी लागणारे मोजणी शुल्क अर्जदाराकडुन परस्पर वसुल करण्याबाबत सुचित केले असता, त्यांनी पत्र दिनांक ४.१.२००८ अन्वये सुधारित मो.र.क्र.५१२/२००७ नुसार मोजणी शिटची क प्रत प्रकरणात सादर केली आहे.

अ-२) प्रकरणात प्राप्त सुधारित भुखंडक निहाय मोजणीच्या क प्रती प्रमाणे अर्जदार यांनी सुधारित सिमांकित अभिन्यास या कार्यालयास अंतीम मंजुरीसाठी सादर केले असता, सिमांकित अभिन्यासाच्या प्रती सहाय्यक संचालक नगर रचना अकोला यांना अंतिम मंजुरीचे शिफारसीसाठी पाठविण्यात आल्यात. त्यानुसार त्यांचेकडील पत्र क्र.अकृषी/मौजा हिंगणा-म्हैसपुर स.क्र. ६२/३ /ससंअ/१४४ दिनांक २८.१.२००७८ नुसार नेहमीच्या अटी व शर्थीस अधिन राहून सिमांकित अभिन्यासास अंतीम मंजुरी देऊन निवासकामी अकृषक आकारणी निर्धारित करुन देण्यासाठी शिफारस केली आहे. सदर प्रकरणात खालील विभागाकडुन अभिप्राय-अहवाल मागविण्यात आले असुन त्यांनी खालील प्रमाणे अहवाल दिले आहेत.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER
सत्यमेव जयते
AKOLA

अ-३) सदरहू प्रकरणात विषयांकित जमिन ही प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गाचे वळण मार्गालगत असल्याने कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, क्र.१३, अमरावती यांचेकडील पत्र क्र.४५४/तां.अनु.२ दिनांक ७.२.२००६ नुसार खालील अटीचे अधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र देण्यास हरकत नसल्याचे अहवालीत केले.

(१) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय) नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक एनएचआय/१२०२५/६/९८, पी.आय.दिनांक २००२ नुसार रस्त्याच्या मध्यभागापासुन ७५ मिटरचे आंत इमारतीचे बांधकाम करता येणार नाही. तसेच इमारतीचे बांधकाम राष्ट्रीय महामार्गाचे विभागीय कार्यालयाच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. अर्जदारास बांधकामाची वेगळी परवानगी घ्यावी लागेल.

(२) अकोला वाशिम रस्त्यावर वळण मार्गाचा उड्डाण पुल प्रस्तावित असल्यामुळे सदर ठिकाणची प्रस्तावित वळण मार्गाची (महमार्गाची) उंची निश्चितच ६.०० मिटर एवढी राहील क्ष्यामुळे प्रस्तावित अभिन्यासाकरीता पोचमार्ग देता येणार नाही.

(३) केंद्र शासनाच्या भुपृष्ठ मंत्रालयाचे परिपत्रक क्रमांक III/पी/७२/७६ दिनांक १३.१.९७ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार इमारतीची उंची १३.०० मिटर पेक्षा जास्त असु नये. तसेच उक्त परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना व स्टॅण्डर्ड बिल्डींग ॲण्ड डेव्हलपमेंट कंट्रोल नियम लागु राहतील तसेच भविष्यात या नियमांत बदल झाल्यास ते सुध्दा अर्जदारास लागु राहतील.

(४) राष्ट्रीय महामर्ग क्र.६ नागपुर-एदलाबाद राष्ट्रीय महामार्गाचे मध्यभागापासुन २२.५० मिटर अंतरापर्यन्त शासकीय जागेत कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही. याची खबरदारी घ्यावी अन्यथा मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ प्रकरण क्रमांक ४, अनुक्रमांक २० ते २५ नुसार शासकीय जागेत करण्यात आलेले अतिक्रमण तात्काळ हटविण्यात येईल त्याकरीता येणारा खर्च अर्जदाराकडुन वसुल करण्यात येईल.

..३..

293

15

(५) राष्ट्रीय महामार्गाचे बाजुला बांधकाम करतांना/बांधकाम पूर्ण झाल्यानंतर महामार्गावरील वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याची जबाबदारी अर्जदाराची असेल, अन्यथा मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ प्रकरण क्र.४ अनुक्रमांक २२ मधिल तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) भारत सरकार भुतल परिवहन व महामार्ग मंत्रालय नवि दिल्ली यांचे परिपत्रक डब्ल्यु/एनएच-३३०२३/१९/१९९९ डिओ-III दिनांक ३१.८.२००० मधिल अनुक्रमांक ४ मधिल ४.२ मधिल तरतुदीनुसार राष्ट्रीय महामार्ग विभाग पोचमार्ग देण्यास बंधनकारक राहणार नाही.

(७) सांडपाणी महामार्गाच्या हद्दीत सोडता येणार नाही. जेणेकरुन महामार्गाचा पृष्ठभाग तसेच बाजु खराब होऊन कोणत्याही प्रकारचा अपघात होणार नाही

(८) महामार्गावर अस्तित्वात असलेली झाडे तोडली जाणार नाहीत, याची अर्जदाराने दक्षता घ्यावी तसेच प्रस्तावित स्थळ वृक्षारोपण करणे बंधनकारक राहील.

(९) राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत कोणतीही वाहने उभी राहुन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

(१०) राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यभागापासून २२.५० मिटर अंतरापर्यंत कोणत्याही प्रकारचे जाहिरात फलक लावता येणार नाहीत.

(११) पाणी पुरवठा लाईन, मलनिस्सारण पाईप लाईन, विद्युत केबल किंवा टेलीफोन केबल करीता रस्ता खोदण्याची स्वतंत्र परवानगी राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.१३ अमरावती यांचेकडुन घ्यावी लागेल.

(१२) भुखंडामध्ये कोणत्याही प्रकारचा धाबा किंवा हॉटेल लावण्यात येऊ नये.

(१३) महामार्गाच्या मध्यभागापासुन ७५ मिटर अंतरानंतर नकाशात दर्शविल्याप्रमाणे सेवामार्ग बांधण्यात यावा.

ब) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र.जिप/आवि/अकृषक/२३८४/२००५ दि. २६.४.२००५ नुसार मौजे हिंगणा-म्हैसपुर ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं. ६२/३ क्षेत्र ३.१५ हे.आर. अकृषकतेच्या विस्तारास प्रस्तावित असलेली सदर जमिन रहीवासकामी आरोग्याचे दृष्टीने योग्य असल्याचे अभिप्राय दिले आहे. सदर प्रकरणात अभिप्रायाची प्रत संलग्न केली आहे.

क) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अकोला यांचे पत्र क्र.काअ/अकोला/ग्रामीण/तांत्रिक/सअ/३७१२ दिनांक १९.४.२००५ नुसार प्रस्तावित जमिनीचे अकृषक आकारणीस हरकत नसल्याबाबत अभिप्राय दिला आहे.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER सत्यमेव जयते AKOLA

ड) विशेष भुमि संपादन अधिकारी (का.पु.मो.प्र.) अकोला यांनी त्यांचे पत्र क्र.अको/विभुसंअ/कापुमोप्र/कावि-१२८९/२००५ दिनांक १३.१२.२००५ नुसार सदरहू प्रस्तावित जमिनीचे भुसंपादन करावयाचे प्रकरण सुरु नसुन, भूसंपादन करण्याचे प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत असे कळवुन, यापुर्वी सदर जमिन अर्जित करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत आपले स्तरावर पडताळणी करुन घ्यावी असे अभिप्राय दिले आहेत.

ई) पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-२८/पुनर्वसन/आस्था/कावि-८१४/२००५ दिनांक २२.९.२००५ नुसार मौजे हिंगणा-म्हैसपुर येथील शेत सर्व्हे नं. ६२/३ यातील क्षेत्र ३.१५ हे.आर. हया जमिनीचा अतिरीक्त जमिन म्हणुन संपादनाचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे अहवालीत केले आहे.

ग) कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र.५७३/७/रेशा/अकृषक/०५ दिनांक ७.२.२००६ अन्वये शेत सर्व्हे नं.६२/३ यातील क्षेत्र ३.१५ हे.आर. जमिन पाटबंधारे विभागांतर्गत मोर्णा प्रकल्पाचे लाभक्षेत्रात येते, परंतू वाढत्या शहरीकरणामुळे व आज रोजी सदर शेत ओलीत होत नसल्यामुळे सदर जमिनीस अकृषक रुपांतरणास परवानगी देण्यास कोणतीही हरकत नाही. असे कळविले आहे.

ह) मंडळ अधिकारी अकोला यांनी दिनांक २०.४.२००५ नुसार सविस्तर मोका पाहणी अहवाल तसेच मालकीहक्क अभिलेख तपासणी करुन अहवाल सादर केला, आपले अहवालात त्यांनी सदरहू जमिनीचा मुळधारणअधिकार हा वर्ग-१ संज्ञेतील असल्याचे स्पष्ट

करुन, सदरहू मिळकत ही अर्जदाराकडे खरेदी हक्काने आली असुन सदर क्षेत्र आज रोजी ग्राम पंचायत हिंगणा-म्हैसपुर हद्दीत समाविष्ट असल्याचे अहवालीत केले आहे.

ज) प्रकरणात सचिव, ग्राम पंचायत हिंगणा-म्हैसपुर ता.जि.अकोला मौजे हिंगणा-म्हैसपुर शिवारातील शेत सर्व्हे नं.६२/३ क्षेत्र ३.१५ हे.आर. जमिनीचे अकृषक आकारणीसाठी रुपांतर करण्यास हरकत नसल्याबाबत ठराव प्रकरणात सादर केला आहे.

त) प्रकरणात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र ४३६३/तां.स.आ-२/२००२ दि. २९.६.२००५ अन्वये नेहमीचे अटीस अधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे.

थ) मुख्याधिकारी, अमरावती गृहनिर्माण क्षेत्र व विकास मंडळ, अमरावती ह्यांनी सदरहू जमिन म्हाडाचे भु-संपादनात समाविष्ट नसल्यामुळे अकृषक आकारणीस रुपांतर देणेबाबत हरकत नाही असे अभिप्राय पत्र क्र.१२८३ दिनांक २८.६.२००५ नुसार दिले आहेत.

प्रकरणात संबंधित जमिनीचा जाहीरनामा दिनांक ९.३.२००५ प्रसिध्दीनुसार कोणाचेही कोणतीही हरकत अथवा आक्षेप विहीत मुदतीत किंवा हितसंबंध आता पावेतो या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

सदर प्रस्तावित क्षेत्र मौजे हिंगणा-म्हैसपुर ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे ६२/३ क्षेत्र मोजणीनुसार ३.११ हे.आर. जमिनीस बिनशेती निवासकामी परवानगी देण्याचे दृष्टीने ग्रामीण भागातील गैरनागरी क्षेत्रातील अकृषक कर आकारणी प्रमाणदर १९९१ चे प्रमाणदराप्रमाणे आकारणी निर्धारित करुन देण्याचे शासन निर्देश आहेत. तसेच प्रकरणातील निवासी वापर करण्यात येणा-या अकृषक आकारणीचा तपशिल खालील प्रमाणे विवरणात नमुद केलेला आहे, परंतु यानंतर शासनाचे वेळावेळी प्राप्त होणारे अकृषक कर आकारणी वाढीबाबतच्या आदेशाचे अनुपालन करणे सर्व आवेदकास तसेच संबंधितांना बंधनकारक राहील.

| विवरण | जमिनीचे क्षेत्रफळ चौ.मि. | अकृषक कर आकारणी रुपये ०.०४ पैसे प्रति चौ.मि. |
|---|---|---|
| मौजे हिंगणा-म्हैसपुर ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं.६२/३ मधिल मोजणी नकाशाप्रमाणे रुपांतरणाखालील क्षेत्र | ३११००.०० | -- |
| १) अभिन्यासातील कृषक जमिनीखालील क्षेत्र. | ११०२५.०० | -- |
| २) अभिन्यासातील भुखंडाखलील क्षेत्र | १०७१३.८९ | ४२८.५५ |
| २) अभिन्यासातील सार्वजनिक सुविधा भुखंडकाखालील क्षेत्र प्लाट क्र.४३ | १००९.७७ | ४०.४० |
| ३) अभिन्यासातील खुल्या जागेचे क्षेत्र | २०१२.०६ | -- |
| ३)अभिन्यासातील रस्त्याखालील क्षेत्र | ६३३९.२८ | -- |
| एकुण रुपांतरणाखालील क्षेत्र | ३११००.०० | पुर्णांकित ४६९.०० |

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER सत्यमेव जयते AKOLA

४. जमिन अकृषक रुपांतरणाखालील अभिन्यासांतर्गत खुली जागा व रस्त्याखालील जागा सार्वजनिक वापरात येत असल्याने हया जमिनीवरील अकृषक कर आकारणीस महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(४) अन्वये खाली नमुद विवरणात दर्शविल्याप्रमाणे अकृषक आकारणीतुन सुट देण्यात येत आहे.

..५..

| विवरण | क्षेत्रफळ | सुट दिलेला आकार/कर |
|---|---|---|
| १)अभिन्यासातील खुल्या जागेचे क्षेत्र | २०१२.०६ | ८०.५० |
| २)अभिन्यासातील रस्त्याखालील क्षेत्र | ६३३९.१८ | ५५३.६० |

मंजुर केलेल्या अभिन्यासातील निवासी भुखंडावर अकृषक कर आकरणीचा तपशिल या आदेशासोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविलेला आहे.

५. सदर प्रकरणात प्रस्तावित जमिनीबाबतचे मालकीहक्क, आवेदकांनी सादर केलेले कागदपत्रे, मंडळ अधिकारी यांचे चौकशी अहवालानुसार आवेदकांचे जमिनीचे मालकीहक्क व जमिनीचे भोगवटदार वर्ग-१ चे खातेदार असल्याचे स्पष्ट होत आहे. विषयांकित जमिनीवर दि. अकोला अर्बन को-ऑप.बॅंकेचा गहाण बोझा रक्कम ६०,००,०००/- साठ लक्ष इतका असुन सदरहू मिळकतीवर गहाण बोझा कायम ठेवून अकृषक परवानगी देण्यास हरकत नाही, असे नाहरकत प्रमाणपत्र शाखाधिकारी, दि.अकोला अर्बन को-ऑप.बॅंक लि.अकोला यांनी दिले आहे. तसेच प्रकरणात दिनांक १०.९.२००७ रोजी अर्जदार प्रकाश जमनादास आनंदाणी व वासुदेव जमनादास आनंदाणी यांनी अर्ज सादर करुन आपले अर्जात श्री. जमनादास दुर्गादास आनंदाणी हे दिनांक १९.७.२००५ रोजी मरण पावले असलेमुळे वारसहक्कान्वये सदरहू जमिन वासुदेव जमनादास आनंदाणी व प्रकाश जमनादास आनंदाणी यांचे नांवे आली आहे, तरी अकृषक आदेश त्यांचे नांवे पारित करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

६. आवेदकांनी उक्त जमिनीवर विज, पाणी, रस्ते व नाल्या ई.सोयी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसेच अर्जदारानी प्रतिज्ञापत्र सादर करुन अकृषक आदेशातील अटी व शर्थी मान्य असल्याबाबतचे शपथ पत्र सादर करुन मंजुर अभिन्यासातील खुल्या जागेवर जलपुर्न:भरण (Rain water Harvesting) ची व्यवस्था स्वखर्चाने करण्याचे मान्य केले आहे.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER AKOLA

७. सबब उपरोक्त माहिती-अहवालान्वये मी, तेजुसिंग पवार, उपविभागीय अधिकारी अकोला या द्वारे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (२) अन्वये मौजे हिंगणा-म्हैसपुर ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं.६२/३ मधिल क्षेत्र मोजणी नकाशाप्रमाणे ३.११ हे.आर. या शेतजमिनीचे आवेदक १. वासुदेव जमनादास आनंदाणी २. प्रकाश जमनादास आनंदाणी, सर्व रा.हिमालय आईस फॅक्टरी गुरुद्वाराजवळ, अकोला यांना निवासी प्रयोजनासाठी अकृषक वापर करण्यासाठी खाली नमुद शर्ती व अटीवर परवानगी मंजुर करीत आहे.

अटी व शर्ती :-

१. सदरची परवानगी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व त्याखालील प्रचलित नियमाच्या तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

२. उक्त जमिन ज्या कारणास्तव अकृषीक वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहे, त्याच निवासी प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावा. सदर जमिनीचा निवासप्रयोजनाखेरीज इतर दुस-या कारणासाठी उपयोग/वापर उपविभागीय अधिकारी अकोला यांचे पुर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

३. जमिनीच्या सिमांकित मंजुर अभिन्यासातील भुखंडकाचे विभाजन उपविभागीय अधिकारी यांचे पुर्व परवानगीशिवाय वापर करता येणार नाही. मात्र विभाजन करावयाचे झाल्यास व तसा अर्ज प्राप्त झाल्यास, सदरचे आदेशातील अटी व शर्तीचा तसेच महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम व इतर संबंधित नियमांच्या तरतुदीचा भंग होऊ न देता परवानगी देण्यास उपविभागीय अधिकारी सक्षम असतील. सक्षम अधिका-याचे पुर्व परवानगी शिवाय भुखंडकाचे विभाजन करता येणार नाही.

४. आवेदकानी सादर केलेल्या अभिन्यासानुसार तसेच तालुका निरीक्षक भुमि अभिलेख अकोला यांनी जागेवर तात्पुरत्या मंजुर अभिन्यासाप्रमाणे केलेल्या भुखंडनिहाय मोजणी

296
19

३) भविष्यात या मार्गाचे रुंदीकरण करावयाचे असल्यास रुंदीकरणात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४) हय लेआऊट मधील भुखंडावर बांधकाम करतांना रस्त्याचे मध्यापासुन ३७.०० मिटर अंतरावर बांधकाम करावे.

१४. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, क्र.१३, अमरावती यांचेकडील पत्र क्र.४५४/ तां.अनु.२ दिनांक ७.२.२००६ नुसार खालील अटींचे पालन करणे अर्जदारास/उत्तराधिका-यास पालन करणे बंधनकारक राहील.

(१) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय) नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक एनएचआय/१२०२५/६/९८, पी.आय.दिनांक २००२ नुसार रस्त्याच्या मध्यभागापासून ७५ मिटरचे आंत इमारतीचे बांधकाम करता येणार नाही. तसेच इमारतीचे बांधकाम राष्ट्रीय महामार्गाचे विभागीय कार्यालयाच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. अर्जदारास बांधकामाची वेगळी परवानगी घ्यावी लागेल.

(२) अकोला वाशिम रस्त्यावर वळण मार्गाचा उड्डाण पूल प्रस्तावित असल्यामुळे सदर ठिकाणची प्रस्तावित वळण मार्गाची (महमार्गाची) उंची निश्चितच ६.०० मिटर एवढी राहील त्यामूळे प्रस्तावित अभिन्यासाकरीता पोचमार्ग देता येणार नाही.

(३) केंद्र शासनाच्या भूपृष्ठ मंत्रालयाचे परिपत्रक क्रमांक III/पी/७२/७६ दिनांक १३.१.१९९७ मध्ये दिलेल्या तरतुदीनूसार इमारतीची उंची १३.०० मिटर पेक्षा जास्त असू नये. तसेच उक्त परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना व स्टॅण्डर्ड बिल्डींग ॲण्ड डेव्हलपमेंट कंट्रोल नियम लागू राहतील तसेच भविष्यात या नियमांत बदल झाल्यास ते सुध्दा अर्जदारास लागू राहतील.

(४) राष्ट्रीय महामर्ग क्र.६ नागपूर-एदलाबाद राष्ट्रीय महामार्गाचे मध्यभागापासुन २२.५० मिटर अंतरापर्यंन्त शासकीय जागेत कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही. याची खबरदारी घ्यावी अन्यथा मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ प्रकरण क्रमांक ४, अनुक्रमांक २० ते २५ नुसार शासकीय जागेत करण्यात आलेले अतिक्रमण तात्काळ हटविण्यात येईल त्याकरीता येणारा खर्च अर्जदाराकडून वसुल करण्यात येईल.

(५) राष्ट्रीय महामार्गाचे बाजूला बांधकाम करतांना/बांधकाम पूर्ण झाल्यानंतर महामार्गा वरील वाहतूकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याची जबाबदारी अर्जदाराची असेल, अन्यथा मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ प्रकरण क्र.४ अनुक्रमांक २२ मधिल तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER AKOLA

(६) भारत सरकार भुतल परिवहन व महामार्ग मंत्रालय नवि दिल्ली यांचे परिपत्रक डब्ल्यू/एनएच-३३०२३/१९/१९९९ डिओ-III दिनांक ३१.८.२००० मधिल अनुक्रमांक ४ मधिल ४.२ मधिल तरतूदीनुसार राष्ट्रीय महामार्ग विभाग पोचमार्ग देण्यास बंधनकारक राहणार नाही.

(७)सांडपाणी महामार्गाच्या हद्दीत सोडता येणार नाही. जेणेकरुन महामार्गा न पृष्टभाग तसेच बाजू खराब होऊन कोणत्याही प्रकारचा अपघात होणार नाही.

(८)महामार्गावर अस्तित्वात असलेली झाडे तोडली जाणार नाही, याची अर्जदाराने दक्षता घ्यावी तसेच प्रस्तावित स्थळ वृक्षरोपण करणे बंधनकारक राहील.

(९) राष्ट्रीय महमार्गाच्या हद्दीत कोणतीही वाहने उभी राहून वाहतूकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

(१०)राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यभागापासुन २२.५० मिटर अंतरापर्यन्त कोणत्याही प्रकारचे जाहीरात फलक लावता येणार नाहीत.

(११) पाणी पूरवठा लाईन, मलनिस्सारण पाईप लाईन, विद्युत केबल किंवा टेलीफोन केबल करीता रस्ता खोदण्याची स्वतंत्र परवानगी राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.१३ अमरावती यांचेकडुन घ्यावी लागेल.भुखंडामध्ये कोणत्याही प्रकारचा धावा किंवा हॉटेल लावण्यात येऊ नये.

(१२)भुखंडामध्ये कोणत्याही प्रकारचा धाबा किंवा हॉटेल लावण्यात येऊ नये.

(१३) महामार्गाच्या मध्यभागापासन ७५ मिटर अंतरानंतर नकाशात दर्शविल्याप्रमाण सेवामार्ग बांधण्यात यावा.

१५. अभिन्यासामधील जागेवर अथवा नियमबाहय बांधकाम केल्यास आवेदक/ संबंधित भुखंडधारक यांचे विरुध्द प्रचलित नियमान्वये कार्यवाही करण्यात येईल, त्याबाबतचा शासनास येणारा खर्च जमिन महसुल म्हणुन वसुलीस पात्र राहील व आवेदक अथवा संबंधित भुखंडधारक यांना त्यांचा भरणाकरणे बंधनकारक राहील.

..८..

२९८/२०

१६. भुखंडावर बांधकाम करतांना खालील प्रमाणे समासाची अंतरे सोडणे भुखंडधारकास बंधनकारक राहील.

| भुखंडाचे क्षेत्रफळ (चौ.मिटर मध्ये) | समोरुन/रस्त्या कडुन सोडावयाचे अंतर | मागील बाजुने सोडावयाचे अंतर | दोन्ही बाजुने सोडावयाचे अंतर |
|---|---|---|---|
| ४५०.०० चौ.मि.पेक्षा जास्त | ४.५० मिटर | ४.५० मिटर | ३.०० मिटर |
| ३००.०० चौ.मि.पेक्षा जास्त | ४.५० मिटर | ३.०० मिटर | २.२५ मिटर |
| १५०.०० चौ.मि.पेक्षा जास्त | ३.०० मिटर | १.५० मिटर | १.५० मिटर |
| १००.०० चौ.मि. पेक्षा जास्त आकाराचे भुखंडक | ३.०० मिटर | १.५० मिटर | १.५० मि.एक बाजुने सामाईक भिंत |

अभिन्यासातील जमिनीवर निव्वळ निवासी प्रयोजनार्थ क्षेत्र १०७१३.८९ चौ.मि. तसेच सार्वजनिक सुविधा भुखंडक क्र.४३ चे १००९.७७ चौ.मि. आहे. सन् १९९१ च्या अकृषक आकारणीच्या प्रमाणदराप्रमाणे अकृषक आकारणीदर प्रमाणदराइतका आहे, त्याप्रमाणे ०.०४ पैसे प्रति चौ.मि. प्रमाणे अकृषक कर पुर्णाकित रक्कम ४६९/- (रुपये चारशे एकोणसत्तर फक्त). तसेच जिल्हा परिषद सेस अकृषक आकारणीचे ७ पटीत म्हणजे ३२८३/-(रुपये तिन हजार दोनशे त्र्याऐंशी फक्त) निश्चित होत आहे, तसेच ग्राम पंचायत सेस रुपये ४६९/-(रुपये चारशे एकोणसत्तर फक्त) प्रतिवर्ष आकारणी निश्चित होत असुन, आवेदकास प्रतिवर्ष अकृषक कर आकारणीचा भरणा बंधनकारक राहील. तसेच यासंबंधी शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील. आवेदकाने सदरक्षेत्राचे रुपांतरणाबाबत अकृषक आकारणीच्या पाचपटीत रुपांतर कर रक्कम रुपये २३४५/-(रुपये दोन हजार तिनशे पंचेचाळीस फक्त) चा भरणा करणे बंधनकारक राहील.सदरच्या जागेबाबत सद्याच्या प्रचलित दराने अकृषक आकारणी निर्धारित करुन देणेत आली आहे, परंतु यासंबंधी शासनाचे वेळावेळी प्राप्त होणारे अकृषक आकारणी वाढीबाबतचे आदेशाचे अनुपालन करणे आवेदकांस तसेच संबंधित भुखंडकधारकांना बंधनकारक राहील व सदरहू निर्धारित करुन देण्यात आलेली आकारणी शासनाचे आदेशानुसार फेरबदलास/पुर्नविलोकनास पात्र राहील, सबब यासंबंधी वेळोवेळी शासनाकडुन निर्गमित होणारे नियम व अटीचे पालन करणे भुखंडधारकास बंधनकारक राहील.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER AKOLA सत्यमेव जयते

१७. आवेदकाने प्रस्तावित जमिनीचा प्रत्यक्ष अकृषक वापर एक वर्षाचे आंत करावा, व तसे केल्याबाबतचा अहवाल जमिनीचा वापर सुरु केल्यापासुन एक महिण्यात या कार्यालयास संबंधित तलाठी/तहसिलदार यांचेमार्फत सादर करावा, तसे न केल्यास महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ नुसार कार्यवाही करण्यात येईल.सदर अभिन्यासमधील भुखंड विक्री करण्यापुर्वी जमिनीचे विकास अंतर्गत पाणी पुरवठा, विजपुरवठा, अंतर्गत रस्ते, नाल्या सोई उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आवेदकाची राहील.

..९..

(298) 21

१८. सदर अभिन्यासमधील जमिनीचा विकास आवेदकाने परवानगी दिनांकापासुन एक वर्षाचे आंत करावा व तसा अहवाल संबंधित तलाठी/तहसिलदार यांचे मार्फत सादर करावा अन्यथा सदरची परवानगी ही एक वर्षानंतर आपोआप व्यपगत होईल.

१९. वरीलपैकी कोणतही अटीचे/शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त बाबतीत नियमानुसार उपविभागीय अधिकारी जो दंड आकारतील त्याचा भरणा करणे आवेदकास बंधनकारक राहील अथवा आदेशातील अटीचे उल्लंघन केल्यास आदेश रद्द केल्या जातील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामाची संपूर्ण जबाबदारी आवेदकाची राहील.

विशेष अट १.प्रकरणांतर्गत आवेदकाने सादर केलेले मालकीहक्काबाबतचे कागदपत्र अभिलेखावरुन जमिन त्यांच्या ताब्यातील व मालकीची असल्याचे दिसुन येते. तथापी भविष्यात जमिनीबाबत/जमीनीचे मालकीहक्क, वारसहक्क, जमीनीच्या हद्दीबाबत किंवा अन्य बाबीचे वादामुळे कोणत्याही हक्कास बाधा आल्यास तसेच आवेदकाने सदरचे आदेशातील अटी व शर्ती तसेच नगर रचना कार्यालयाने दिलेल्या अटी व शर्थीचे उल्लंघन केल्यास सदर निवासी प्रयोजनार्थ अकृषक वापराची परवानगी आदेश रद्द/व्यपगत होतील.

२. सदरहू अकृषक परवानगी आदेश कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग क्र.१३ यांचे अभिप्रायानुसार राष्ट्रीय महामार्गाचे मध्यभागापासुन ७५ मिटर अंतर सोडून व त्यानंतर सेवामार्ग सोडून भुखंड विकास करणे अनुज्ञेय आहे, महामार्गाचे मध्यरेषेपासुन ७५ मिटर परिसराचे आंत कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

३. सदरहू अट क्र.२ चे अधिनतेने सिमांकित मंजुर अभिन्यासात अर्जदार व त्यांचे उत्तराधिकारी यांनी आवश्यक बदल करण्यास कुठलाही कसूर केला असल्याचे आढळून आल्यास सदरहू अकृषक परवानगी आदेश व्यपगत समजून अर्जदार व त्याचा हितसंबंधीत पुर्वाधिकारी/उत्तराधिकारी नियमानुसार कार्यवाहीस पात्र राहील.

४. प्रकरणातील जमिनीवर दि.अकोला अर्बन को-ऑप. बॅन्क लि.अकोला यांचा रुपये ६०,००,०००/- चा गहाण बोझा आहे, सदरहू बोझ निरंक होई पावेतो प्रकरणातील सर्वच भुखंडावर अबाधित ठेवण्यात येत आहे.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER AKOLA — सत्यमेव जयते

उपविभागीय अधिकारी
अकोला.

(4)

प्रतिलीपी :- मा.जिल्हाधिकारी अकोला माहितीसाठी सविनय सादर

१. सहाय्यक संचालक, नगर रचना अकोला

२. तहसिलदार अकोला/ तलाठी मौजे हिंगणा-म्हैसपुर मार्फत तहसिलदार अकोला. आपणांस कळविण्यात येते की, सदरहू जमिनीवर दि.अकोला अर्बन को-ऑप. बॅन्क लि. यांचा रुपये ६०,००,०००/- चा गहाण बोझा सर्वच भुखंडावर निरंक होई पावेतो अबाधित ठेवण्यात यावा.

३. सचिव, ग्राम पंचायत हिंगणा-म्हैसपुर ता.जि.अकोला

४. अर्जदार- श्री.वासुदेव जमनादास आनंदाणी व इतर एक रा.,अकोला
यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

उपविभागीय अधिकारी
अकोला.

स.सं.न.र.

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
अकोला शाखा

न.र.

आवक क्र. ६६०
दिनांक २०।५।१८
फाईल क्र. ----------

..१०.. प्रपत्र अ

विषय :- मौजे हिंगणा-म्हैसपुर ता.जि. अकोला येथील शेत सर्वे नं.६२/३ मधिल मोजणीनकाशाप्रमाणे क्षेत्र ३.११ हे.आर. जमिनीच्या निवासी प्रयोजनाकरीता अकृषक वापरास परवानगी मिळणेबाबत.अर्जदार श्री. वासुदेव जमनादास आनंदाणी व इतर एक रा.अकोला रामाक्र.एनएपी-३४/हिंगणा-म्हैसपुर/४१/२००४-२००५

| भुखंड क्रमांक | एका भुखंडाचे क्षेत्र (चौ.मि.) | भुखंडकाचे प्रति चौ.मि. ०.०४ प्रमाणे अकृषक कर | जि.प.सेस | ग्राम पंचायत सेस |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | ४९५.०० | १९.८० | १३८.६० | १९.८० |
| २. | ४८०.०० | १९.२० | १३४.४० | १९.२० |
| ३. | ४८०.०० | १९.२० | १३४.४० | १९.२० |
| ४. | ४८०.०० | १९.२० | १३४.४० | १९.२० |
| ५. | ४८०.०० | १९.२० | १३४.४० | १९.२० |
| ६. | ४८०.०० | १९.२० | १३४.४० | १९.२० |
| ७. | ४८०.०० | १९.२० | १३४.४० | १९.२० |
| ८. | ५७५.२१ | २३.०० | १६१.०५ | २३.०० |
| ९. | २४५.०२ | ९.८० | ६८.६० | ९.८० |
| १०. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| ११. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| १२. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| १३. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| १४. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| १५. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| १६. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| १७. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| १८. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| १९. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| २०. | २१०.०० | ८.४० | ५८.८० | ८.४० |
| २१. | १५७.५० | ६.३० | ४४.१० | ६.३० |
| २२. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| २३. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| २४. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| २५. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| २६. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| २७. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| २८. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| २९. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| ३०. | १५०.०० | ६.०० | ४२.०० | ६.०० |
| ३१. | १७१.९० | ६.९० | ४८.३५ | ६.९० |
| ३२. | १६२.०० | ६.५० | ४५.४० | ६.५० |
| ३३. | १६०.०० | ६.४० | ४४.८० | ६.४० |

..11..

229 23

.. प्रपत्र अ..

विषय :- मौजे हिंगणा-म्हैसपूर ता.जि. अकोला येथील शेत सर्वे नं.६२/३ मधिल मोजणीनकाशाप्रमाणे क्षेत्र ३.११ हे.आर. जमिनीच्या निवासी प्रयोजनाकरीता अकृषक वापरास परवानगी मिळणेबाबत.अर्जदार श्री. वासुदेव जमनादास आनंदाणी व इतर एक रा.अकोला

रामाक्र.एनओपी-३४/हिंगणा-म्हैसपूर/४१/२००४-२००५

| १. | २. | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|---|
| ३४. | १६०.०० | ६.४० | ४४.८० | ६.४० |
| ३५. | १६०.०० | ६.४० | ४४.८० | ६.४० |
| ३६. | ५६०.०० | २२.४० | १५६.८० | २२.४० |
| ३७. | ५६९.७६ | २२.८० | १५९.५५ | २२.८० |
| ३८. | ४५०.०० | १८.०० | १२६.०० | १८.०० |
| ३९. | ४५०.०० | १८.०० | १२६.०० | १८.०० |
| ४०. | ४५७.५० | १८.३० | १२८.१० | १८.३० |
| एकुण | १०७१३.८९ | ४२८.५५ | २९९९.९० | ४२८.५५ |
| सार्वजनिक सुविधा भूखंड क्र.४३ | १००९.७७ | ४०.४० | २८२.७५ | ४०.४० |
| एकुण | १४२६१.२७ | पूर्णांकित ४६९.०० | ३२८३.०० | ४६९.०० |

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER AKOLA सत्यमेव जयते

(signature) /412

उपविभागीय अधिकारी
अकोला.